# विना वाहन दिनास वाढता प्रतिसाद

दिनांक १४ मार्च, ०८ रोजी मा.महापालिका आयुक्त, प्रवीणसिंह परदेशी आणि सर्व मा.पदाधिकारी यांनी मंगळवार हा दिवस विना वाहन दिवस म्हणून पाळण्याचे आवाहन केले होते. या आवाहनास महापालिका अधिकारी, सेवक, मा.पदाधिकारी व मा.सभासद यांचा दिवसेंदिवस पाठिंबा वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यानुसार दर मंगळवारी महापालिकेतील मा.पदाधिकारी, मा.सभासद, अधिकारी आणि कर्मचारी स्वेच्छेने वाहनांऐवजी सायकल, पायी अथवा पीएमपीएमएल च्या बसेसद्वारे कार्यालयात येत आहेत. दिनांक १८/३/०८ ते २२/४/०८ या कालावधीत सर्वसाधारणपणे दर मंगळवारी सुमारे ८०० पेक्षा जास्त अधिकारी/कर्मचारी, मा.पदाधिकारी व सभासद वाहनांचा वापर करीत नसल्याचे आढळून आले आहे व दिवसेंदिवस या संस्थेत वाढ होत आहे.

# खरी करुणा

करुणा म्हणजे लोकसेवा करण्याची खरी इच्छा. इतरांच्या दु:ख मुक्तीसाठी लावलेला खरा हातभार. पण हे सर्व निरासक्त असायला हवे. जर आपण इतरांचे दु:ख पाहून स्वत:च रडायला सुरुवात केली तर आपण स्वत:लाच दु:खी करुन घेतो. जर आपल्याजवळ खरी करुणा असेल तर पूर्ण प्रेमाने, शक्तीनिशी आपण इतरांना मदत करण्याचा प्रयत्न करतो. आपण त्यात अयशस्वी झाला तर त्याचा हसत स्विकार करुन परत मदतीचा दुसरा मार्ग शोधणे शक्य होते. आपल्या सेवेचा काय परिणाम होणार आहे याची चिंता न करता आपण सेवा कराल हीच खरी करुणा आहे.

**कल्याणवार्ता**
एप्रिल, २००८
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. प्रविणसिंह परदेशी**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖

❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org
**फक्त खाजगी वितरणासाठी**
(विनामूल्य)

# मन

मन माझे कठोर
हृदय माझे कोमल
कोणीच समजू शकत नाही माझ्या भावना
पुन्हा पुन्हा त्या दु:खाच्या वेदना
पदोपदी चिडणे, रुसणे
कसे हे जीवघेणे जिणे,
साथ ना सखा-सहेली
एकटीच आहे ही जीवनाची हवेली
मी तर आहे एक समुद्राची लाट,
काय नाते कोणाचे या लाटेशी?
कोणी आणलेच नाही किनाऱ्याशी
मी सुखदुखाच्या गोष्टी केल्या
फक्त माझ्या अश्रूंशी
फक्त माझ्या अश्रूंशी.

(कवी - श्री.अ.ल.कांबळे,
बिगारी,
उप आयुक्त (गवनि))

# गुणवंत कामगार पुरस्कार

पुणे महापालिका कामगार कल्याण निधीतर्फे देण्यात येणारे सन २००७-०८ चे गुणवंत कामगार पुरस्कार दिनांक १ मे, २००८ रोजी सायंकाळी ५.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे वितरित करण्यात येणार आहेत. सर्व सभासदांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे.

# महापालिका क्रिकेट संघ नाझर अली चषक विजेते

पुणे जिल्हा क्रिकेट संघटना आयोजित कै.सदु शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धायरी इलेव्हन क्लबवर मात करुन पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने नाझर अली चषकावर आपले नाव कोरले.



कै.सदु शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेत झालेल्या एकूण ५ सामन्यांमध्ये विजय मिळवून पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने ५५ गुणांची कमाई करीत प्रथम गटातून बाद फेरीमध्ये प्रवेश केला नाझर अली चषकाच्या बाद फेरीमध्ये झालेल्या दोन सामन्यात पुणे महानगरपालिकेने विजय संपादन करुन उपांत्य फेरी गाठली.

उपांत्य फेरीचा सामना पुणे महानगरपालिका क्रिकेट संघ विरुध्द इगल्स क्लब यांचेमध्ये दिनांक १९/०४/२००८ रोजी विधी महाविद्यालयाच्या मैदानावर संपन्न झाला . या सामन्यात देवदत्त देवकर ६१ तर लक्ष्मीकांत शिंदे यांचे ३९ धावा केल्या. गणेश मांजरे यांनी ४४ धावांत ३ तर श्री गणेश आवळे यांनी ४८ धावात ३ बळी मिळविले. या जोरावर महानगरपालिका संघावर इगल्स क्लबवर ७ गडी राखून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला.

अंतिम सामना दिनांक २६/०४/२००८ रोजी विधी महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडला. पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना धायरी इलेव्हन क्लबने ४० षटकामध्ये २५३ धावा करण्याचे आव्हान महापालिका क्रिकेट संघापुढे ठेवले.



या मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना महापालिका क्रिकेट संघाने एक वेळ ६ बाद ११३ अशी बिकट अवस्था होती. या वेळी ६ व्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या घनश्याम मुलतानी (९९) व ८ व्या क्रमांकावर फलंदाजीस आलेला बाजीराव थोपटे (नाबाद ४४) यांनी ७ व्या विकेटसाठी ११७ धावांची बहुमोल भागीदारी केली व अशक्यप्राय असा वाटणारा विजय संघाकडे खेचून आणला. सामन्याचा मानकरी हा मान घनश्याम मुलतानी याने मिळविला.

पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने यापूर्वी महाराष्ट्र क्रिकेट असोशिएशन, पुणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन, आंतर महानगरपालिका क्रिकेट स्पर्धा इत्यादी स्पर्धांमध्ये सहभागी होवून कौतुकास्पद कामगिरी मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार कामगार यांचे मार्गदर्शनाखाली आणि स्टेडियम व्यवस्थापक मा. सुभाष पुरी यांच्या विशेष सहकार्याने बजावली आहे.

# खरे सुख

जीवनातील खऱ्या सुखाचे स्पष्टीकरण करताना अनेक थोर विचारवंत आणि समाजसुधारकांनी या अनुषंगाने येणाऱ्या सर्व गोष्टींचे दोन गट तयार केले आहेत. आपली कौटुंबिक व सामाजिक जबाबदारी पार पाडून इतरांना कल्याणकारी होतील अशी कामे करणे आणि दुसरा असा की ज्यामुळे मनाचे शुध्दिकरण होईल, अशी कामे करणे. स्वत:चे कल्याण हे इतरांच्या कल्याणाशिवाय पूर्ण होवू शकत नाही.

जेंव्हा जेंव्हा आयुष्यातील चढउतारांशी
सामना करावा लागतो
तेंव्हा देखील मन स्थिरच रहाते,
शोक नाही, दुर्भावना नाही
नेहमीच शांत, निर्भय, भयरहित वाटणे
हेच तर सर्वोत्कृष्ट सुख आहे

काहीही घडत असो मग ते मनाच्या आतील असलेल्या विश्वाच्या सूक्ष्म प्रतिकृतीत असो, शरीरात असो किंवा बाहेरच्या जगात असो आपल्याला त्याच्याशी सामना अगदी सहज, मनात कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण न करता, राग व द्वेष येवू न देता, आंतरमनाच्या खोलीतून येणारे हास्य चेहऱ्यावर घेवून करता आला पाहिजे. प्रत्येक परिस्थितीत सुखात वा दु:खात, हवीहवीशी वा नकोशी असणारी, मनात यत्किंचितही चिंता व असुरक्षितता वाटायला नको. उलट मनात अनित्यतेच्या जाणीवेने येणारी पूर्ण सुरक्षितता पाहिजे. हाच खरा आनंद, हेच खरे सुख आहे.

# मनाची समता हीच खरी समता

तुम्ही स्वत:च स्वत:चे मालक आहात. जगातील कोणतीही गोष्ट तुमच्यावर अधिकार गाजवू शकत नाही. आयुष्याने जे जे तुम्हाला दिले आहे ते सर्व तुम्ही हसतमुखाने स्विकारु शकता. हे समजणे हाच मनाचा खरा समतोल आहे. मनाची खरी समता म्हणजे काही नकारात्मक किंवा निष्क्रिय अलिप्तता नव्हे. संसारातल्या समस्यांपासून पळून जाण्यासाठी व आपले तोंड लपविण्यासाठी विरोध न करता अंधपणे स्विकारलेली गोष्ट म्हणजे मनाची समता नाही. तर उलट आयुष्यातील सर्व समस्यांची, सत्याच्या सर्व पातळीवरुन पूर्ण जाणीव ठेवून जगाशी सामना करुन टिकणारी मनाची समता हीच खरी समता आहे.